पूर्वा
कृषिदूत
प्रबोधनातून परिवर्तन... मासिक

संस्थापक संपादक
डॉ. बी.बी. पवार

संपादक
डॉ. भास्कर गायकवाड

संपादन सहयोग
पराग वाड

चित्रांकन आणि मांडणी
कैलास भामरे

व्यवस्थापक - लेखा विभाग
राजेंद्र बागुल

सहकार्य
विजय पवार
संचालक, पूर्वा ॲग्रोटेक

सुहास कदम
संचालक, पूर्वा ॲग्रो मार्केटिंग

महेश पाटील
संचालक, पूर्वा केमटेक, खान्देश

विजय नाईकरे
विभागीय व्यवस्थापक- पूर्वा केमटेक, पुणे

सचिन दिघे
विभागीय व्यवस्थापक- पूर्वा केमटेक, संगमनेर

रईस इनामदार
विभागीय व्यवस्थापक- पूर्वा केमटेक, कोपरगाव

नंदकिशोर चतरकर
विभागीय व्यवस्थापक- पूर्वा केमटेक, विदर्भ

संजय पाटील
विभागीय व्यवस्थापक- पूर्वा केमटेक, मराठवाडा

पूर्वा केमटेक प्रा.लि.,
एम ११३, एमआयडीसी अंबड,
नाशिक-४२२०१०
मो. ७४२००१४७८१
email:poorvakrushidoot@gmail.com

# संपादकीय



## शेतीशास्त्र आणि संस्कृती यांचा परस्पर संवाद गरजेचा

डॉ. भास्कर गायकवाड
(संपादक : 'पूर्वा कृषिदूत')
मो. ९८२२५१९२६०
gaikwadbh@yahoo.com

- कृषिक्षेत्रातील परंपरा आणि नवता यांच्यात साहचर्य हवे
- गोदामात धान्याच्या राशी; तरीही लक्षावधी लोक उपाशी
- एकसाची पीक पद्धतीमुळे जमिनीची उत्पादकता घटत गेली
- पंचमहाभूतांवर वर्चस्व गाजवण्याच्या नादात मानवाने गमावले सर्वस्व
- विषयुक्त कृषिनिविष्ठांमुळे पिके रोगकारक; खाणारेही संकटात
- सजीव सृष्टीच्या हितासाठी निसर्गाधारित कृषिशैली अनिवार्य

आज प्रगत शेतीशास्त्राचा अवलंब होत असताना त्यामध्ये संस्कृती, परंपरा यांना कोणतेच स्थान उरलेले नाही. प्रगत शेतीशास्त्र आणि संस्कृती यांच्यामध्ये योग्य संवाद झाला तरच शेतीचा विकास होईल. उपासमार आणि निसर्गाचा होणारा ऱ्हास रोखण्यासाठी आजचे शेतीशास्त्र उपयुक्त ठरत नसून; मागील १०,००० वर्षांपासून सुरु झालेली शेतीपध्दती आणि संस्कृती यांच्यात सुसंवाद झाला पाहिजे, अशी भावना जागतिक पातळीवर रूजावी. आजच्या या प्रगत शेतीपध्दतीमुळे आम्ही निसर्गावर मात केली, असा गैरसमज करून घेत असतानाच, निसर्गाच्या विरोधात जाऊन शेती केल्यामुळे अनेक निसर्गाधारित समस्या- संकटांना सामोरे जावे लागत आहे. संशोधनातून नवनवीन तंत्रज्ञान विकसित होत असतानाच अनेक प्रश्नही निर्माण होत आहेत. म्हणूनच संशोधक, नियोजक आणि शासन यांच्या शेतीशास्त्राकडे बघण्याच्या दृष्टिकोनामध्ये बदल होण्याची गरज आहे.

### स्थानिक ग्राम स्वावलंबनाकडे दुर्लक्ष झाले

महात्मा गांधींनी १० जून १९४७ रोजी एका सभेला उद्देशून केलेल्या आपल्या भाषणात सांगितले होते की, पहिला धडा हा शिकला पाहिजे की आपण स्वावलंबी, स्वयंपूर्ण आणि आत्मनिर्भर होण्यासाठी आपल्या संस्कृतीचा विचार करून तंत्रज्ञानाचा अवलंब केला पाहिजे. आपल्या देशातील मोठ्या प्रमाणातील पशुधन

सर्वांना दूध पुरवू शकते. दुधाचे उत्पादन कमी येते हा आपला दोष आहे. देशातील हवामान, जमिनीची विभिन्नता आणि संस्कृतीच्या जीवावर आपण देशातील समाजालाच नव्हे तर जगातील समाजाला अन्न खाऊ घालू शकतो. मात्र त्यांच्या या वक्तव्याची अव्यवहार्य तत्त्वज्ञान अशी हेटाळणी झाली! आपण आपल्या स्वत:च्या वैभवाला (विभिन्न जमीन, हवामान, जैवविविधता, संस्कृती, परंपरा) मूठमाती देत परदेशी तंत्रज्ञान डोक्यावर घेतले. आज आपण गर्वाने सांगतो की, देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला. परंतु आजही जगातील उपाशी राहणाऱ्या संख्येच्या ३३ टक्के समाज आमच्या या खंडप्राय देशामध्ये आहे ही शरमेची बाब आहे! एकीकडे देशातील गोडावूनमध्ये अन्नधान्य पडून आहे तर दुसरीकडे लाखो माणसे उपाशी झोपतात. गहू, तांदूळ यांना भाव नाही कारण जास्त उत्पादन! दुसरीकडे मात्र हजारो कोटी रुपये परकीय चलन खर्च करून कडधान्ये, तेलबियांची आयात आपण करतो. या बाबी का होतात याचा विचार करण्याची वेळ आली आहे.

## निसर्गावर सत्ता चालवण्याचा प्रयत्न आत्मघातकी

पंजाब, हरियाणासारख्या राज्यांमध्ये पहिल्यांदा हरितक्रांती झाली. हरितक्रांतीपूर्वी तेथे पिकामध्ये विभिन्नता होती. त्यामुळे तेथील जमीन, पर्यावरण चांगले होते. हरितक्रांतीनंतर भात, गहू यांचे उत्पादन वाढले. तेलबिया, कडधान्ये उत्पादन बंद झाले. त्याचा परिणाम जमीन, पर्यावरणावर झाला. आज तेथील ९० ते ९५ टक्के जमिनीमध्ये सेंद्रिय कर्बाचे प्रमाण ०.३० टक्क्याच्या खाली आहे. तसेच ३५ ते ४० टक्के जमिनीचा सामू, क्षारता वाढून उत्पादकता घटली आहे. याचा परिणाम पीक उत्पादनावर; तसेच तेथील शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती बिघडून सामाजिक सुरक्षेवर झाला आहे. हीच परिस्थिती देशामध्ये तसेच जगामध्ये झाली आहे. एक पीक पध्दती, नवीन तंत्रज्ञानाचा जास्त वापर आणि पारंपरिक ज्ञानाची केलेली हेटाळणी यामुळे आज शेती व्यवसाय जागतिक पातळीवर शाश्‍वत राहिलेला नाही. शेतीशास्त्राचा अवलंब करताना निसर्गाचा विचार केला जात नाही. इतर सजीवांप्रमाणेच मानवही निसर्गातील एक सजीव आहे. इतर प्राण्यांपेक्षा माणसाला बुध्दीची देणगी मोठ्या प्रमाणात मिळाल्यामुळे त्याने निसर्गाला, म्हणजेच ज्याने निर्माण केले त्यालाच आपल्या ताब्यात घेण्याचा प्रयत्न सुरु केला. परंतु निसर्ग कोणाचाही दास, बटीक होऊ शकत नाही.

या सर्व बाबींचा विचार पूर्वीच्या शेती पध्दतीमध्ये होता. निसर्गाचा विचार करूनच शेती व्यवसाय केला जात होता. शेती एक सांस्कृतिक नवनिर्मिती आहे, धंदा नसून तो एक धर्म आहे. अशा पध्दतीची शेती पूर्वी केली जात होती. हजारो वर्षांच्या शेती पध्दतीला संस्कृतीची जोड होती. अनेक चालीरीती आणि पध्दतींमागे शास्त्र होते. शेतीमधील या श्रध्देला अज्ञानातून आम्ही अंधश्रध्देचे रुप दिले. अमावस्येच्या दिवशी नांगरट न करणे, वड- पिंपळाची पूजा करणे, शेण-गोमूत्राला धन- लक्ष्मीचे रुप देणे, जमीन- गाईला मातेचा दर्जा देणे, धान्याच्या राशीची पूजा करणे, श्रावणात जमिनीची मशागत न करणे यासारख्या अनेक श्रध्दा- पध्दती होत्या. अर्थात त्यामागे शास्त्रीय कारणेही आहेत. त्यासाठी बघण्याचा दृष्टिकोन सकारात्मक पाहिजे.

## पाश्‍चिमात्य तंत्रज्ञानाचा सरसकट वापर चुकीचा

आजच्या प्रगत शेतीशास्त्रामध्ये मात्र प्राचीन शेती संस्कृतीला कोठेही स्थान देण्यात आलेले नाही. एका देशातील तंत्रज्ञान आंधळेपणाने दुसऱ्या देशात सर्रास वापरले जाऊ लागले. तेथील हवामान, जमीन, राहणीमान, खाण्याच्या सवयी यांचा विचार केला गेला नाही. नैसर्गिक साधनसंपत्ती, जैवविविधता यांचाही प्रगत शेतीशास्त्रामध्ये विचार केला नाही. ऊस गोड लागला म्हणून मुळासह खाऊ नये अशी म्हण आहे. परंतु प्रगत शेतीशास्त्रामध्ये तर रासायनिक शेतीत आणि त्यासाठी वापरल्या जाणाऱ्या निविष्ठांचा मोठ्या प्रमाणात अवलंब झाला. त्यासाठी जमीन, पाणी आणि पर्यावरणाचा यथेच्छ वापर झाला. परिणामी जमिनी नापीक झाल्या. पाणी विषयुक्त झाले. अन्नधान्यांमध्ये विषाचे प्रमाण वाढले. पूर्णान्न म्हटले जाणाऱ्या दुधात

कीटकनाशकांचा अंश वाढला. आजही ८० ते ८५ टक्के मातांच्या दुधामध्ये ठरवून दिलेल्या पातळीपेक्षा जास्त प्रमाणात कीटकनाशकांचा अंश सापडतो. शेती उत्पादन वाढले त्याबरोबर खर्चही वाढला, कर्जबाजारीपणा वाढला, आत्महत्या वाढल्या. जसा आहार तसा विहार या उक्तीप्रमाणे विषयुक्त, अनैसर्गिक अन्न खाणारा समाजही तसाच निकृष्ट झाला. शेतीचा उच्च दर्जा कनिष्ठ झाला. शेतीप्रधान देशामध्ये ही परिस्थिती तर इतर देशांची काय स्थिती! तेथे सरकारच्या अनुदानावर समाज शेती करतो; अन्यथा तेथे पुढे होऊन कोणीही शेती करायला तयार नाही. हे चित्र बदलले पाहिजे. निसर्ग टिकला तरच सर्व समाज टिकेल. त्यासाठी शेती पध्दतीमध्ये योग्य बदल होण्याची गरज आज जागतिक पातळीवरच आहे. त्यामुळेच शेतीशास्त्र आणि संस्कृती यांचा परस्पर संवाद व्हावा. त्याद्वारे योग्य तंत्रज्ञान विकसित होऊन शाश्वत शेती उत्पादन मिळावे आणि शेतीला प्रतिष्ठा मिळावी.

## एकात्मिक कृषि-परामर्श आवश्यक

यापुढील काळात कृषी संशोधन आणि तंत्रज्ञान विकसित होत असताना सर्व बाबींचा एकात्मिक विचार करण्याची गरज आहे. नवीन तंत्रज्ञानाची पारंपरिक ज्ञान आणि संस्कृती यांच्याबरोबर योग्य सांगड घालण्याची गरज आहे. तंत्रज्ञान कितीही चांगले असले परंतु ते निसर्गाच्या विरोधात, नैसर्गिक साधनसंपत्तीचा ऱ्हास करणारे असेल तर अशा तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याचे टाळले पाहिजे. भारतासारख्या कृषिप्रधान सांस्कृतिक देशामध्ये पूर्वजांनी वैविध्यपूर्ण शेती उत्पादन तंत्रज्ञान दिलेले आहेत. जगातील वनस्पती, प्राणी आणि एकूणच जीवसृष्टीपैकी ८० ते ९० टक्के जीवसृष्टी भारतामध्ये असून याचा फायदा करून घेणे आवश्यक आहे. भारतातील महिला कृषिक्षेत्रात जास्त कष्ट करतात. सांस्कृतिक जपणूक आणि संस्कार महिलांच्या हातून घडतात. शेतीमध्ये योग्य सांस्कृतिक पध्दतींचा अवलंब किंवा नवीन तंत्रज्ञानाबरोबर सुसंवाद होण्यासाठी कृषी तंत्रज्ञान विकास आणि प्रसारामध्ये महिलांचा सहभाग वाढणे महत्त्वाचे आहे. उत्पादन वाढविणे हाच उद्देश न ठेवता निसर्गाचे, सर्व जीवसृष्टीचे संवर्धन, संगोपन करण्याची जबाबदारी बुद्धिवान, हुशार म्हणवणाऱ्या मनुष्यप्राण्यावर आहे. शेतीकडे कारखानदारीच्या स्वरुपात न पाहता नवनिर्मिती करणारी ती एक नैसर्गिक साधनसंपत्ती, सुविधा आहे याचा विचार करण्याची गरज आहे. त्यासाठीच मानवाचा निसर्गाबरोबर योग्य सुसंवाद होण्याची गरज आहे. जंगले, जंगलातील जीवसृष्टी, प्राणिमात्र यांचाही सर्व निसर्ग आणि नैसर्गिक उपलब्धींवर मानवाइतकाच हक्क आहे, या दृष्टिकोनातून बघण्याची गरज आहे. अतिरेकीपणाने निसर्गातील साधनसंपत्तीची लूट केली तर निसर्गाचा थोडासा धक्का किती मोठ्या प्रमाणात असतो हे मागील काही वर्षांपासून आपण बघतोच आहोत. म्हणूनच मानवाच्या शाश्वत जीवनासाठी निसर्गाचा शाश्वत विकास करायला पाहिजे. निसर्गाच्या शाश्वत विकासामध्ये शेतीचा मोठा वाटा आहे. निसर्गात जास्त ढवळाढवळ करून त्याचा क्रोध ओढवून घेणे मानवाला झेपणारे नाही. म्हणूनच शेतीच्या शाश्वत विकासासाठी शेतीशास्त्र आणि संस्कृती यांचा अंतर्गत सुसंवाद होणे आवश्यक आहे. या सुसंवादातूनच मानवाचे भविष्य सुखकर होणार आहे. ■

हे मासिक मालक, मुद्रक, प्रकाशक **संजय भास्कर पवार** यांनी निर्मल ऑफसेट प्रा.लि., बी २७, एम.आय.डी.सी. माळेगाव, ता. सिन्नर, जि. नाशिक येथे छापून ४, मिथिला अपार्टमेंट, आकाशवाणी केंद्राजवळ, दातेनगर, गंगापूर रोड, नाशिक- ४२२०१३ येथे प्रकाशित केले.

संपादक : **डॉ. भास्कर गायकवाड.**

* या अंकातील लेखांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.